# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १६/०६/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंर्तगत ०६ कि.मी. अंतरावरील वार्ड नं २ सिक्रेट हार्ट स्कुल पिपळा डाग बंगला येथे दिनांक १६/०६/२०२२ चे रात्री २३.०० वा ते १७/६/२२ चे ०३.०० वा दरम्यान फिर्यादी नामे— सौ हेना शहानावाज खॉन वय ३२ वर्ष, रा वार्ड २, सिक्रेट हार्ट स्कुल पिपळा डाग बंगला यांच्या घरातील मागील चायनल गेटमध्ये लावलेले कुलुप चैन अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दरवाज्याचे कुंडीचे स्क्रु खोलुन घरात प्रवेश करुन किचन रुमला लागुन असलेल्या बेडरुममध्ये ठेवलेली लाकडी आलमारीचा दरवाजा खोलुन तिजोरीचे लॉक तोडुन पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने सोन्या—चांदीचे दागिने एकुण कि. ३,००,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री सुर्यप्रकाश मिश्रा हे सुरू आहे.

### चोरी

१) **पो.स्टे. कन्हान** :— अंर्तगत १० कि.मी. अंतरावरील वेकोली डुमरी साईडींग कन्हान येथे दिनांक ११/०६/२२ चे १८.०० वा. ते दिनांक १२/०६/२२ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— जयेंद्र प्रकाश हिरनवार, वय ३४ वर्ष, रा. कल्पतर कॉलनी कामठी यांचे डुमरी सायडींग ला काम चालु होते आणि तेथुन काम संपल्याने फिर्यादीने ३ लोडर मशीन घेवुन गेले व १ मशीन ब्रेक डावुन झाल्याने घटनास्थळी सोडुन गेले होते. त्यात १५० लिटर डीझेल होते फिर्यादीने जावुन पाहीले असता त्याला २ बॅटऱ्या किं. २०,०००/—रू. व १५० लिटर डिझेल किं. १५,०००/—रू. असा एकुण ३५,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री सुरजेसे मो.नं. ७६६६६४०२१८ हे करीत आहे.

२) **पो.स्टे. बोरी** :— अंर्तगत १५ कि.मी. अंतरावरील मौजा खापरी येथे दिनांक ३०/०५/२२ चे ०३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— पवन सुधाकर मोरे वय ३४ वर्ष रा प्लॉट क्र ४१० राय टाउन वानाडोंगरी नागपुर हे इंडस टावर मोबाईल कंपनी नागपुर ग्रामीण परीसरातील टॉवर चेक करीत असता मौजा खापरी येथील टावर मधील ४८ अमर राजा कंपनीच्या जुन्या वापराचा बॅटऱ्या कि. १२,०००/—रू. व २४ बॅटऱ्या देवळी गुजर येथील जुन्या वापरत्या कि. ६,०००/—रू. असा एकुण कि. १८,०००/—रू. मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री धवराळ मो.नं. ९७६५४९७००५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**